**ठळक बातम्या**

- पारलिंगी हक्कांचे संरक्षण दुरुस्ती विधेयक मागे घेण्याची सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीची केंद्र सरकारला सूचना

- देशभरात श्रीरामनवमीचा उत्साह

- आंध्र प्रदेशात झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू तर २२ जण जखमी

- बांगलादेशात प्रवासी बस नदीत कोसळून झालेल्या अपघातात १८ जणांचा मृत्यू

**आणि**

- ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं निधन

<><><><><>

पारलिंगी हक्कांचे संरक्षण दुरुस्ती विधेयक, २०२६ मागे घेण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीनं केंद्र सरकारला केली आहे. हे विधेयक नुकतंच संसदेत मंजूर झालं होतं. ही समिती दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आशा मेनन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून तिनं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाला पत्र लिहून या दुरुस्तीतल्या काही तरतुदींविषयी गंभीर चिंता व्यक्त करून कायद्याचा पुनर्विचार करायला सांगितलं आहे. या दुरुस्तीमुळे स्व-ओळख हक्क आणि गोपनीयतेवर मर्यादा येत असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं. नवीन कायद्यात अपहरण आणि शोषण यांसारख्या गुन्ह्यांवर कठोर शिक्षा प्रस्तावित आहेत, परंतु हे गुन्हे आधीच इतर कायद्यांतर्गत समाविष्ट असल्याचं समितीनं नमूद केलं आहे.

स्व-ओळख काढून टाकणं हे २०१४ च्या N A L S A अर्थात राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत आहे. त्यामुळे भविष्यातली दुरुस्ती पारलिंगींशी सल्लामसलत करूनच करावी, असंही समितीनं म्हटलं आहे. ही समिती न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या पीठाने स्थापन केली. रोजगार, आरोग्य आणि सार्वजनिक सेवांमध्ये पारलिंगींना येणारे अडथळे तपासणं आणि २०१९ च्या कायद्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी उपाय सुचवणं हे या समितीचं काम आहे.

<><><><><>

आज चैत्र शुद्ध नवमी अर्थात श्रीराम नवमी. देशभरात आज श्रीरामनवमी उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू श्रीरामांचं संपूर्ण जीवन आपल्याला सत्य, न्याय आणि सद्‌गुणाच्या मार्गावर जाण्यासाठी मार्गदर्शन करतं, त्यांचं जीवन आपल्याला समाजाप्रति असलेल्या कर्तव्यांचं पालन करण्याची देखील प्रेरणा देत असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही रामनवमीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन तसंच लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, रामनवमीनिमित्त देशभरातल्या राम मंदिरांमध्ये रामजन्म सोहळ्यासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अयोध्येत श्री राम मंदिरात आज सकाळी रामलल्लांच्या मूर्तीला अभिषेक करून पूजा आणि आरती करण्यात आली. महाराष्ट्रातल्या विविध राममंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे.

<><><><><>

हॉटेलं तसंच खानपान-गृहांसारख्या आस्थापनांनी एलपीजी गॅस किंवा इंधन शुल्क या नावाखाली कोणतंही अतिरिक्त शुल्क आकारू नये असा इशारा केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने दिला आहे. अशा शुल्क आकारणीची तक्रार १९१५ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनच्या मोबाईल ॲपवर करता येईल. जिल्हाधिकारी किंवा थेट प्राधिकरणाकडेही याची तक्रार करता येईल अशी माहिती प्राधिकरणाने दिली आहे.

<><><><><>

न्यू मंगळुरू बंदरात काल रात्री अपोलो ओशन हे एलपीजीवाहू जहाज दाखल झाले आणि लगेचच १६ हजार मेट्रिक टन इंधन उतरवण्याचं काम सुरू झालं. याआधी शिवालिक जहाजानं आपला माल गुजरातमध्ये उतरवला होता, नंतर अपोलो ओशनमार्फत मंगळुरूला पोहोचवण्यात आला. लवकरच आणखी कच्च्या तेलाचे दोन टँकर येण्याची शक्यता आहे, मात्र वेळापत्रक अद्याप निश्चित झालेलं नाही, असं प्रशासनानं सांगितलं.

<><><><><>

आंध्र प्रदेशात मार्कापुरम जिल्ह्यात रायवरमजवळ आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला तर २२ जखमी झाले. खासगी प्रवासी बसची टिपर ट्रकशी टक्कर झाली आणि बसला आग लागली. तेलंगणातल्या जगतियालहून ही बस नेल्लोर जिल्ह्याकडे जात असताना हा अपघात झाला. जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयांत उपचारासाठी हलवण्यात आलं. पोलीस आणि बचाव पथकं अपघातानंतर लगेच घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं. जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमींना अधिक चांगल्या उपचारासाठी गुन्टूरच्या प्रगत वैद्यकीय केंद्रात हलवण्यात आल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला असून जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना व्यक्त केली आहे. या अपघातात मृत्यू पावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या नातेवाईकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. तर जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपये दिले जाणार आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलं.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रति शोकभावना व्यक्त केली आहे. सर्व जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा मिळावी, मृत आणि जखमींच्या कुटुंबांना योग्य भरपाई द्यावी तसंच अपघाताच्या कारणांचा सखोल तपास करावा, असे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**<><><><><>**

बांगलादेशात राजबारी जिल्ह्यात एक प्रवासी बस नदीत कोसळून झालेल्या अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात काल संध्याकाळी झाला. ४० प्रवाशांना घेऊन जाणारी ही बस ढाक्याच्या दिशेने प्रवास करत होती. वाटेत पद्मा नदीवरच्या तरंगत्या फलाटावर अनियंत्रित झाल्यामुळे ती नदीत कोसळली आणि सुमारे ८० फूट खोल पाण्यात बुडाली. घटनास्थळी अग्निशमन दल आणि तटरक्षक दलाचे पाणबुडे, लष्कर आणि पोलिसांच्या मदतीने बेपत्ता झालेल्यांचा शोध घेत आहेत. आतापर्यंत १८ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून त्यात १० महिला आणि २ मुलांचा समावेश आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शोध आणि बचावकार्य अजूनही सुरू आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं आज कोल्हापूर इथं निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज कोल्हापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होत आहेत. शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात लोककल्याणकारी राज्य निर्माण करुन त्या राज्याची घडी आधुनिक जीवन मूल्यांनुसार बसवली हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलु प्रकाशात आणणारे लेखन पवार यांनी केलं.

छत्रपती शिवाजी आणि संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा लढा सुरू ठेवणाऱ्या तसंच करवीर संस्थानच्या संस्थापिका महाराणी ताराराणींचं चरित्र लिहून त्यांचं कर्तृत्व प्रकाशात आणण्याचं महत्वाचं कामही जयसिंगराव पवार यांनी केलं. एकूणच मराठेशाहीचा इतिहास व्यापकपणे समाजासमोर आणण्याच्या कामी जयसिंगराव पवार यांनी महत्वाचं योगदान दिलं आहे.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक - सदस्य आणि नंतर तीन वर्षांसाठी अध्यक्ष होते. त्यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली होती.

तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि शांतपणे मोठं काम करणारा संशोधक हरपणं ही राज्यासाठी मोठी पोकळी आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जयसिंगराव पवार यांना आदरांजली वाहिली आहे. जयसिंगराव पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या वैचारिक आणि ऐतिहासिक संशोधन क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही जयसिंगराव पवार यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याची प्रत्यार्पण आदेशाविरुद्धच्या कारवाईची मागणी करणारी याचिका लंडन इथल्या उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. भारतात आपल्याला छळाचा सामना करावा लागेल त्यामुळे मानवतावादी दृष्टीकोनातून आपलं प्रत्यार्पण होऊ नये, असा युक्तिवाद मोदी याने यापूर्वी झालेल्या संजय भंडारी प्रकरणाचा दाखला देऊन केला होता. मात्र, या प्रकरणाच्या सुनावणीत केंद्रीय अन्वेषण संस्थेच्या अधिकाऱ्यांनी या दाव्याचं खंडन करणारा युक्तिवाद सादर केला. तो न्यायालयाने मान्य केला तसंच, संजय भंडारी यांच्या प्रकरणात लागू झालेली अपवादात्मक परिस्थितीची अट नीरव मोदी याच्या प्रकरणात लागू होत नसल्याचं न्यायालयाने स्पष्ट केलं आणि त्याची याचिका फेटाळली. पंजाब नॅशनल

बँकेतल्या आर्थिक घोटाळ्या प्रकरणी आरोपी असलेला नीरव मोदी २०१८पासून फरार झाला होता. २०१९मध्ये त्याला यूकेत अटक करण्यात आली होती.

**//<><><><><>//**